# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. : २२७९३१०१
फॅक्स क्र. : २२८४६९७४
Email: jalseven.wc@gmail.com
narayan.karad@nic.in

क्रमांक : जशिअ-२०१७/प्र.क्र. ५९७/जल-७
मृद व जलसंधारण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २२ डिसेंबर, २०१७

प्रति,

**विभागीय आयुक्त, (सर्व)**

**विषय : जलयुक्त शिवार अभियान : अभिसरणातून कामे घेणेबाबत.**

राज्यात वारंवार उदभवणा-या टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणुन जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. यासंदर्भात सविस्तर सुचना शासन निर्णय दि. ०५/१२/२०१४ अन्वये निर्गमित केलेल्या आहेत. जलयुक्त शिवार अभियान अमलबजावणी संदर्भात क्षेत्रिय स्तरावरुन उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

१) जलयुक्त शिवार अभियान हे मुख्यत्वे अभिसरणाच्या माध्यमातून राबवयाचे आहे. सबब जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत समाविष्ट असलेली कामे प्रथमत: अभिसरणाच्या माध्यमातून घेणे अभिप्रेत असून जर निधी उपलब्ध होत नसेल तरच विशेष निधीतून घेणे अपेक्षित आहे.

२) सन २०१६-१७ ची गावे पुर्ण करण्याकरिता मार्च २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे आवश्यकता असल्यास सन २०१७-१८ मध्ये सन २०१७-१८ च्या गावासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला विशेष निधी सन २०१६-१७ च्या गावासाठी वापरण्यास हरकत नाही. तथापि सन २०१६-१७ साठी जितका निधी वापरण्यात आला आहे, तितका अतिरिक्त निधी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये सन २०१७-१८ च्या गावाकरिता अभिसरणाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावा.

शक्यतो सन २०१७-१८ मध्ये DPC अंतर्गत इतर विभागाचा खर्च न होणारा निधी प्राधान्याने जलयुक्त शिवार अभियानातील कामाकरिता पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावा.

३) मा. मुख्यमंत्र्याचे अप्पर मुख्य सचिव यांचे पत्र क्र.जशिअ-२०१६/प्र.क्र.६५४/जल-७ दि. १/०२/२०१७ च्या पत्राचे अवलोकन करावे. त्यामधील सुचनाचे पालन करण्यात यावे त्यानुसार जलयुक्त शिवार अभियानासाठी पुरेसा निधी राखून ठेवून खर्च करावा. जिल्हास्तरावरुन वन विभाग, कृषि, लघुसिंचन विभाग (जिल्हा परिषद), इ. यंत्रणांना इतर लेखाशिर्षाअंतर्गत निधी उपलब्ध होत असतो. हा निधी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत असणा-या गावांसाठी वापरणे अपेक्षित आहे.

४) सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेला सर्व निधी मार्च २०१८ पर्यंत खर्च करणे बंधनकारक आहे. **यावर्षी ३१ मार्च अखेर अखर्चित विशेष निधीसह सर्व निधी काढुन ठेवुन पुढे खर्च करण्याची परवानगी मिळणार नाही.** त्यानुषंगाने नियोजन करुन सर्व निधी मार्च २०१८ अखेर खर्च होईल व समर्पित होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५) शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.संकीर्ण २०१७ / प्र.क्र.२४ / जल-२०, दि.०४ सप्टेंबर २०१७ अन्वये निश्चित केलेला रु. २७ प्रति घनमीटर दरानुसार जलयुक्त शिवार अभियानातील गावांत खोलीकरण / रुंदीकरणाच्या कामांसाठी विशेष निधीचा वापर करता येईल.

६) लुज बोल्डर स्ट्रक्चर, वृक्ष लागवड, जैविक बांध, विहीर पुर्नभरण ही कामे MGNREGA अंतर्गत घेण्यात यावी. या कामाकरिता विशेष निधीचा वापर करु नये

७) मजगी सारख्या कामामध्ये जास्त खर्च होतो व जलसंधारण तुलनेमध्ये कमी होतो मजगीची कामे गाव जलपरिपुर्ण होत नसल्यास शेवटचा प्राधान्य म्हणुन निधी शिल्लक असल्यास घ्यावी. मजगीच्या कामावर विशेष निधी अनावश्यक खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.

22/12

(एकनाथ डवले)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त मृद व जलसंधारण.
२) मुख्य अभियंता, लघुसिंचन जलसंधारण, पुणे.
३) संचालक मृद व जलसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे.
४) सर्व जिल्हाधिकारी.
५) सर्व अधिक्षक अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ.
६) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.